# शेतकऱ्यांचे दीपस्तंभ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव,**
इतिहास विभाग प्रमुख,
राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी.
मो.नं. ९८८१५२१८७१
kadammotiram8@gmail.com

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत आपल्या कार्यकतृत्वाने मोलाचे स्थान प्राप्त केले आहे. त्यांचे कार्य हे केवळ एक विशिष्ट क्षेत्रापुरते अथवा विषयापुरते मर्यादित नाही. मानवी विकासाच्या सर्वच क्षेत्राला त्यांनी स्पर्श केला आहे. त्यापैकी एक म्हणजे शेती व्यवसाय होय. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती आहे. भारताची ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. म्हणूनच भारताला कृषिप्रधान देश म्हंटल्या जाते. परंतु आजच्या घडीला बघितले तर शेतीची अवस्था हा तोट्यात चालणारा व्यवसाय झाला आहे. श्रमजीवी, शेतमजूर, शेतकरी दारिद्र्यात जगतांना दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे दारिद्र्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. हे असे का होत आहे याच्या मुळाशी जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषी सुधारणेच्या संदर्भात मौलिक विचारसरणी मांडली. शेतीवर काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला पोटभर खायला मिळत नाही, शिक्षण मिळत नाही, औषधोपचारासाठी पैसा नाही, सदासर्वदा कर्ज, विवंचना, दारिद्र्य आणि सावकारी पाश यामध्ये हा शेतकरी पूर्णतः पिचल्या जात आहे. शेतकऱ्याच्या वाट्याला आलेली ही हलाखीची परिस्थिती ही एकाएकी तयार झाली नाही तर याची पायाभरणी हळूहळू फार पूर्वीपासून चालू होती.

शेती विकासातील मागासलेपणांच्या कारणांचा शोध घेतला असता काही गोष्टी पुढे येतात. त्या म्हणजे शेतीवर वाढलेला लोकसंख्येचा भार, शेतीचे तुकडीकरण, विजेचा अभाव, भांडवलाचा अभाव, औद्योगिकीकरणाची कमतरता, परंपरागत शेतीचे अवजारे, कर्जपुरवठ्याची शासकीय सोय नसणे, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व सावकाराकरवी केली जाणारी पिळवणूक या होत. या समस्या सरकारने त्वरीत सोडविण्याचा विचार केला तर शेतकरी सुखी व समृद्ध व्हायला वेळ लागणार नाही असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

**संशोधनाचा उद्देश :**

१) २१ व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे भारतीय कृषी संबंधी विचाराचे अध्ययन करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार राष्ट्राच्या विकासासाठी कसे उपयोगी आहेत याचा शोध घेणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नदीजोड प्रकल्प व विद्युतनिर्मिती या संबंधीचे विचार जाणून घेणे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीला पूरक जोड व्यवसाय याविषयी विचार जाणून घेणे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीविषयक कार्याचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे महत्त्व :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार महत्त्वपूर्ण आहे. २१ व्या शतकाच्या संदर्भात देशात उत्पन्न झालेल्या कृषी समस्यांचे आकलन व त्या समस्यातून मार्ग काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व त्यांच्याद्वारे केले गेलेले प्रयत्न यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिकित्सक विचार जनमानसापर्यंत पोहोचविणे ही वर्तमान परिस्थितीत आवश्यकता आहे. अत: या संशोधनाचे महत्त्व आणखी वाढत जात आहे.

**संशोधन पद्धती : —**

शोध निबंधाचे अध्ययन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांसंबंधी वेळोवेळी केलेली भाषणे, तत्कालीन वृत्तपत्रातील लेखन इत्यादी होय. तसेच द्वितीय संदर्भ साधने ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयी विचार, संबंधित विविध पुस्तके, मासिके व वर्तमानपत्रे यातून माहिती संकलित केलेली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व्यवस्थेसंबंधीचे विचार आपल्या 'स्माल होल्डींग इन इंडिया ॲड देअर रेमिडिज' (१९१७) मध्ये 'जनरल द इंडियन इकॉनामी' व इतर लेखनात मांडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयावर प्रश्न मांडतांना शेतजमीनीची खाजगी मालकी रद्द करुन त्याऐवजी सामुदायिक मालकी प्रस्थापित करावी असे मत मांडले होते. विखुरलेल्या जमिनीच्या तुकड्यामुळे होणारे दुष्परिणाम ते जमिनीच्या एकत्रिकरणामुळे कमी होतील, पण एकत्रित आणलेल्या जमिनी जर आर्थिक दृष्टीने फलदायी नसतील तर त्याचा काहीही उपयोग नसतो असे त्यांना वाटत होते. योग्य तो खर्च दिल्यानंतर स्वत:ला व कुटूंबात योग्य अशा सुखात राहण्यासाठी ज्या ठिकाणी उत्पन्न निघेल, अशी आर्थिकदृष्टींनी फलदायी शेतीची व्याख्या त्यांनी मान्य केली नव्हती. त्यावर टिकाच केली होती. ही व्याख्या उत्पादनावर अधिष्ठित नसून उपयोगावर अधिष्ठित असते अशी टिका त्यांनी केली.

**जमीन वतन कायदा :—**

ग्रामीण, दलित शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जमीन वतन कायदा केला. शेतमजूरांनी दिवभर जमीनदाराकडे राबराब राबावे आणि त्या बदल्यात त्यांना काय तर अत्यल्प मोबदला मिळावा. हे त्यांचे जीवघेणे दु:ख थांबविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी श्रमिक शेतमजुरांची संघटना उभारली. जो शेती कसेल त्यालाच शेती मिळाली पाहिजे असा कायदा संमत करुन भूमिहिनांना भूमीधारक बनविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**जमीनीचे लहान लहान धारण क्षेत्र :—**

भारतात शेतीला अत्यंत महत्त्व होते. असे म्हटले जात असते की, उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी यामुळे शेती असण्याला महत्त्व दिले जात होते. या संबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'शेती हे उपजिविकेचे एकमेव साधन असल्यामुळे अजिबात नसण्यापेक्षा लहानसा का होईना पण जमीनीचा तुकडा आपल्या स्वाधीन असावा अशी लोकांची धारणा होती. जमिनीच्या लहान लहान तुकड्यापासून काहीना काही फायदा होणे हेच लहान धारण क्षेत्राच्या समस्येचे उगमस्थान आहे' जमीनीचे

लहान तुकडे असल्यास उत्पादनक्षमता कमी होते. एकीकडे वाढती लोकसंख्या व जोडीला कमी उत्पादन यातून बऱ्याच समस्या निर्माण होतात.

**सहकारी शेती :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व्यवसाय सुधारण्याकरिता सहकारी शेतीचे समर्थन केले. वेगवेगळ्या लोकांकडे विखुरलेली लहान—लहान तुकड्यातील जमिनीमुळे उत्पादन पुरेसे होत नाही. त्यामुळे सहकारी शेतीचा प्रयोग करण्याची गरज प्रतिपादन केली. देशातील जमीनदारी पद्धत संपविण्यासाठी सहकारी शेती फायदेशीर ठरेल.

**शेती राष्ट्रीय उद्योग :—**

शेती हा राष्ट्रीय उद्योग व्हावा असे त्यांना वाटत होते. शेती राष्ट्रीय उद्योग झाल्यानंतर उत्पन्नाचे सुद्धा समप्रमाणात वितरण होईल. शेतीसाठी लागणारे उपकरणे, जनावरे, खत, बियाणे शेतकऱ्यांना पुरविणे हे सरकारला बंधनकारक होईल. जमीनीचे वाटप करतांना जात आणि धर्माचा विचार केला जाणार नाही. जमीनीचे असे वितरण केले जाईल की कोणतेही खाजगी कुळ किंवा भूमिहीन शेतकरी शिल्लक राहणार नाही. कृषी व उद्योग क्षेत्रावर भांडवल पुरविण्याची जबाबदारी त्यांनी राज्यावर टाकली.

**नदी जोड प्रकल्प :—**

भारतातील शेती निसर्गावर अवलंबून आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडत असतो. त्यामुळे शेतीचे नुकसान होते. यातून मार्ग काढण्यासाठी बाबासाहेबांनी उत्तर भारतातील नद्या व दक्षिण भारतातील नद्या जोडून महापुर व कोरडा दुष्काळ टाळला जाऊ शकतो असा त्यांचा विचार किती महत्त्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दामोदर नदी प्रकल्प योजनेच्या माध्यमातून महापूराच्या विनाशापासून वाचवण्यासाठी दामोदर प्रकल्प उभारला. नदी जोड प्रकल्पाची अंमलबजावणी केली असती तर देशातील शेती सिंचनाखाली आली असती तसेच विद्युतनिर्मीती मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन औद्योगिक भरभराट झाली असती.

**शेतीला पुरक उद्योग : —**

शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग हे त्याच भागात निर्माण करावे. हे उद्योग शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या लाभासाठी निर्माण झाले पाहिजे. या उद्योगधंद्यातून मिळणाऱ्या नफ्याची न्याय तत्वावर समान वाटणी झाली पाहिजे. जो वंचीतपणे जगत आला त्याला अग्रहक्क देण्याीच गरज आहे हे त्यांनी वेळोवेळी निक्षून सांगितले.

**जमीन महसुल : —**

काही विशिष्ट रक्कमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलाची माफी मिळाली पाहिजे. जमीन महसुलाच्या बाबतीत गरीब व श्रीमंत यांना सारखाचा कर भरावा लागतो म्हणून जमीन महसूल प्राप्तीकरांच्या कक्षेत आणला पाहिजे असे मत प्रतिपादन केले होते.

**खोती पद्धत :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई कायदे मंडळात असतांना खोती पद्धत रद्द करण्यासंबंधी विधेयक मांडले होते. खोती पद्धत ही रत्नागिरी, ठाणे, कुलाबा या ठिकाणी होती. खोती पद्धतीमध्ये शेतसारा गोळा

करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केलेली असे. या पद्धतीमध्ये जमीन कसणाऱ्याला (कुळाला) कनिष्ठ भूधारक व खोताला वरिष्ठ भूधारक असे संबोधले जाई. अशा प्रकारे खोती पद्धत उत्तर भारतात प्रचलित असलेल्या जमीनीदारी पध्दतीशी मिळती जुळती होती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ ला खोती नष्ट करणारे बील सरकार समोर मांडले.

**सारांश :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार अत्यंत मोलाचे होय. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्याची व शेती व्यवसायाच्या स्थितीचा वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक अभ्यास डॉ. आंबेडकरांचा होता. जमीन धारणक्षेत्रे, अल्पभूधारक, खोती पद्धत, सहकारी शेती, सामुदायिक शेती, नदीजोड प्रकल्प, धरणांची निर्मिती, विद्युत निर्मिती, प्रकल्प, रस्ते अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी नियोजनबध्द रितीने कार्य केले आहे. वर्तमानस्थिती कृषीक्षेत्राची प्रगती व विकास दिसतो. त्यामागे डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रबांधणीत दुरदृष्टीपणा होता म्हणून भारतीय शेती क्षेत्राला प्रगतीकडे नेणारे खरे कृषीतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ठरतात म्हणूनच शेतकऱ्यांचे दीपस्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात.

**संदर्भ :—**

१. मुणगेकर भालचंद्र (१९९३) डॉ. आंबेडकर यांचे भारतीय शेतीविषयक विचार पृ.३८०, फडके य.दि. (संपा.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२. कीर धनंजय (२००६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ३१६
३. तुपे सु.दा. (१९९३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जमीनधारणा पृ. ४०३, फडके (संपा.) डॉ. बाबासाहेब गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
४. डॉ. धनराज डहाट (संपा): डॉ.बाबासाहेब आंबेडकर— भाषण आणि विचार खंड—४, संकेत प्रकाशन, नागपूर.
५. प्रदिप गायकवाड (संपा) (२०१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जनता, समता प्रकाशन, नागपूर.
६. पवार ज. वि. (२०१३) विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मेत्ता प्रकाशन, गोवंडी, मुंबई.
७. डॉ. आबेडकर बाबासाहेब (१९९८), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे.